# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 248 /2020 दिनांक: 22 / 04/2020

वाचा- 1. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 216 /2020 दिनांक 14.04.2020

2. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय मुंबई क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 21.04.2020

## आदेश

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड – 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-१९) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअथी, महाराष्ट्र शासनाने दिनांक 17 एप्रिल 2020 अन्वये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. आणि**

**ज्याअर्थी,** या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/-कावि 216 /2020 दिनांक 19.04.2020 नुसार अकोला जिल्हयात दिनांक 03.05.2020 रोजीचे मध्यरात्रीपर्यंत अत्यावश्यक व जिवनावश्यक वस्तूची साठवणूक विक्री व वाहतूक या करिता संचारबंदीच्या कालावधीमध्ये सूट देण्यात आलेली आहे.**आणि**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय मुंबई क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 नुसार, कोवीड-19 च्या नियंत्रणासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या याविषयी एकत्रीत मार्गदर्शक सुचनांमध्ये सुधारीत मार्गर्शक सूचनांमध्ये दुरुस्ती करण्याबाबत दिनांक 21 एप्रिल 2020 च्या अधिसूचनेनुसार निर्देशीत केले आहे.

**त्या अर्थी**, मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचनेनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकरानुसार,महाराष्ट्र शासनाचे दिनांक 21 एप्रिल 2020 चे सुधारीत अधिसूचनेनुसार अकोला जिल्हयाकरिता खालील दर्शविल्याप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

1. ई-कॉमर्स कंपन्यांचे, ई-कॉमर्स ऑपरेटरद्वारे आवश्यक वस्तुंची डीलिव्हरी, औषध निर्माण व वैद्यकिय उपकरणे या करिता वापरण्यात येणा-या वाहनांना परवानगी राहील.
2. मिष्ठान्न, मिठाई, फरसान, स्वीटमार्ट या प्रतिष्ठानांना सकाळी 06.00 ते दु. 12.00 तसेच सायं. 04.00 ते 07.00 या कालावधीत वितरण व विक्री करीता परवानगी देण्यात आली होती. सदर परवानगी याद्वारे रद्द करण्यात येत आहे.
3. दिनांक 20 एप्रिल 2020 पासून प्रिंट मिडीयाद्वारे (वृत्तपत्रे, मासिके) ज्या ठिकाणी डोअर टू डोअर सेवा पुरविण्यात येत आहे.अशा ठिकाणी ज्ञानप्राप्त व्यक्तीद्वारे , मास्क लावून, हात स्वच्छ धुवून , तसेच सामाजिक अंतर ठेवून लॉकडावून मधून सूट देण्यात येत आहे. परंतू Containtment Plan नुसार Containtment Zone म्हणून निश्चित केलेल्या क्षेत्राकरिता सदर सूट लागू राहणार नाही.

सदर आदेश दिनांक 21.04.2020 रोजी पासून दिनांक 03.05.2020 चे मध्यरात्रीपर्यंत अंमलात राहतील. वरिल आदेशांचे उल्लंघन केल्यास त्यांचेवर परिशिष्ट 3 मध्ये नमूद केल्यानुसार आपत्ती व्यवस्थापन

NitinN 333

अधिनियम, 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 , फौजदारी प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 , भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 व इतर संबधित कायदे व नियम यांचे अंतर्गत कारवाई करण्यात येईल

सदर आदेश आज **दिनांक 21 एप्रिल 2020** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)
जिल्हादंडाधिकारी, अकोला
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी-**

1. मा. विभागीय आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
3. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
4. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला
5. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
6. उपविभागीय अधिकारी ---------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. तहसिलदार -------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
8. प्रकल्प अधिकारी,नगर पालिका प्रशासन अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
9. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

जिल्हादंडाधिकारी, अकोला
जिल्हादंडाधिकारी,अकोला